शैक्षणिक संदर्भ अंक १३४ फेब्रुवारी - मार्च २०२२

महा इतिहास - भाग १६

# शहरांच्या संस्कृती

लेखक : प्रियदर्शिनी कर्वे

महा इतिहास - भाग १६

# शहरांच्या संस्कृती

**लेखक : प्रियदर्शिनी कर्वे**

*शेती व पशुपालनाच्या जीवनशैलीतूनच शहरी संस्कृतीचा उगम कसा झाला याचा आपण मागील लेखात थोडक्यात ऊहापोह केला. पण शहर म्हणजे नेमके काय? शहरीकरणामुळे एक नवी मानवी समाजव्यवस्था कशी निर्माण झाली? जगाच्या विविध भागांमध्ये शहरीकरण कसकसे उलगडत गेले? या आणि अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करूया या लेखातून.*

भटके जीवन सोडून एका जागी स्थिरावल्यापासून मानवी जीवनशैलीने इतर मोठ्या प्राण्यांच्या जीवनशैलीपासून फारकत घेतली. तिथून पुढील मानवी वाटचाल ही पृथ्वीवर दुसऱ्या कोणत्याही सजीवापेक्षा वेगळ्या वाटेने झालेली आहे. या संक्रमणात शहरीकरण हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

वाड्या-वस्त्यांच्या (काहीशे लोकवस्ती) तसेच गावांच्या (काही हजार लोकवस्ती) तुलनेत शहरांचा विस्तार खूप मोठा असतो आणि शहरांची लोकसंख्याही खूप जास्त (काही लाखांच्या घरात) असते. वस्तीत सर्व माणसे एकमेकांना ओळखत असतात आणि त्या सर्वांचे एकमेकांसोबत सामाजिक आणि आर्थिक नातेसंबंध घट्ट जुळलेले असतात. गावामध्येही अगदी प्रत्येक कुटुंबाचा प्रत्येक इतर कुटुंबांशी थेट संबंध येत नसला तरी साधारण परिचय असतो. बव्हंशी अन्नोत्पादन (शेती किंवा पशुपालन किंवा दोन्हीही) व त्यासंबंधी वस्तू व सेवांची देवाणघेवाण हा वस्ती किंवा गावाला जोडून ठेवणारा धागा असतो. शहरांमध्येही लोकांमध्ये परस्परावलंबित्वाचे नाते असते पण ते खूप


अधिक गुंतागुंतीचे असू शकते. शहरातील प्रत्येक माणूस आपली स्वतःची खासियत असलेले काम करत असतो (उदा. सुतारकाम, लोहारकाम, गवंडीकाम, कुंभारकाम, विणकाम, सैनिक म्हणून चाकरी, देवळाचा पुजारी, कलाकार, इ.) व त्या सेवा व उत्पादनांच्या बदल्यात अन्न व इतर जीवनावश्यक बाबी मिळव्यात ही त्याची अपेक्षा असते. या व्यापारी देवाणघेवाणीत सहभागी लोकांसाठी एकमेकांविषयी जिव्हाळा किंवा त्यांच्यात काही व्यक्तिगत नातेसंबंध असणे अजिबात गरजेचे नसते.

माणासांप्रमाणे सामाजिक संबंध प्रस्थापित करणाऱ्या इतर प्राणी प्रजातीमध्ये ५०-१०० पेक्षा अधिक जीवांनी एकमेकांबरोबर सहकार्याचे नातेसंबंध निर्माण केल्याचे दिसत नाही. त्यामुळे हजारो-लाखो अपरिचित लोकांचा परस्परावलंबी समाज घडवता येणे हे उत्क्रांतीद्वारे मानवाला प्राप्त झालेले आणखी एक वैशिष्ट्य समजता येईल. या वैशिष्ट्याचा पहिला दृश्य परिपाक म्हणजे शहरे. शहरीकरणापासून जागतिकीकरणापर्यंतचा पल्ला या वृत्तीमुळेच आपण गाठू शकलो आहोत.

शहरांमध्ये सहसा अन्नोत्पादन होत नाही व त्यासाठी शहरानजिकच्या शेतकरी व पशुपालकांची गरज पडते. त्याचवेळी शहरांतील लोकांनी बनवलेली हत्यारे, मडकी, टोपल्या व इतर तंत्रज्ञाने वापरून अन्नोत्पादनाची कार्यक्षमता वाढवता येते आणि आजूबाजूच्या भागातील शेतकरी व पशुपालक आपले स्वतःचे आणि जवळील शहराचे पोट भरू शकतात. अशा रितीने शहरे व त्यांभोवतालची गावे व वाड्या-वस्त्या यांची एक परस्परावलंबी रचना त्या परिसरात तयार होते. एकाच परिसरातील काही शहरे, गावे, वस्त्या व त्यांच्या आजूबाजूची शेती, कुरणे, जंगले इ. साऱ्या भूप्रदेशावर एकच आधिपत्य असेल – एकाच राजाला किंवा नेत्याला सर्वजण कर पोहचता करत असतील व तो राजा किंवा नेता त्या बदल्यात आक्रमणांपासून व नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण पुरवत असेल – तर या भूप्रदेशाला ‘राज्य (स्टेट)’ म्हणतात. पण राज्यातील विविध आकार व प्रकारच्या वस्त्यांमध्ये विखुरलेल्या जनतेला केवळ स्थानिक प्रशासकच एकत्र बांधत असतो असे

नाही तर बरेचदा इतर सामाजिक व सांस्कृतिक बंधही राज्याला एकत्र ठेवण्यासाठी कारणीभूत असतात.

साधारण इ.स.पूर्व ३६०० च्या सुमारास तैग्रीस व युफ्रेटिस नद्यांच्या दोआबात जगातले सर्वात जुने राज्य व सर्वात जुने शहर उदयाला आले असे समजले जाते. हे राज्य म्हणजे सुमेर उर्फ दक्षिण मेसोपोटेमिया. आजचा दक्षिण इराक (बगदाद शहरापासून पर्शियन सामुद्रधुनीपर्यंतचा प्रदेश)




*मेसोपोटेमियातील शहरे (स्रोत – विकीपिडिया)*

म्हणजेच पूर्वीचा सुमेर. सुमेरमधील सर्वात जुने शहर म्हणजे उरुक. मेसोपोटेमिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागामधील शहरांची स्थाने दाखवणारा नकाशा सोबत दिला आहे. उरुक यापैकी सर्वात जुनेच नाही तर सर्वात मोठे शहर होते.

सुमेर प्रांत म्हणजे तैग्रिस व युफ्रेटिस नद्यांच्या मुखांचा दलदलीचा प्रदेश होता. तिथे फक्त खजुराची झाडे, चिनारचे वृक्ष आणि मासे व पाणकोंबड्यांनी समृध्द असे पाणथळ भाग होते. पण शतकानुशतकांपासून नद्यांनी आणून टाकलेल्या गाळामुळे जमीन सुपीक होती. त्यामुळे नियंत्रित सिंचन करण्याची कला हस्तगत केल्यावर माणसांना तिथे शेती करणे शक्य झाले. गहू, बार्ली आणि

अंबाडीची शेती या भागात होत असे. शेतीच्या आजूबाजूचा भाग बराचसा माळरानाचा होता आणि तिथे शेळी व मेंढी पालन केले जाई. यापलिकडे मात्र पूर्ण वाळवंट व डोंगराळ भाग होता.

साधारण इ.स.पूर्व ४००० पासून पुढे हजारेक वर्षे या भागातील हवामान अधिकाधिक कोरडे होत गेले. पावसाचे प्रमाण कमी झाले आणि पावसाचा कालावधीही साधारण नोव्हेंबर ते एप्रिल या सहा महिन्यांपुरता मर्यादित झाला. शेती व पशुपालन करता येण्यासारखे क्षेत्र मर्यादित असल्याने या भागात लोकसंख्या वाढत गेली तरी लोकांना मानवी वस्त्यांचा विस्तार वाढवणे शक्य नव्हते. त्यामुळे दाटीवाटीची वस्ती असलेले उरुक शहर व त्याभोवती गुंतागुंतीची परस्पर सहकारावर आधारित संस्कृती विकसित झाली. केवळ स्थानिक संसाधनांवर वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवणे शक्य नसल्याने इतर भागांतील समूहांबरोबर व्यापारी संबंध प्रस्थापित करणेही आवश्यक झाले.

सुमेरियन लोकांकडे व्यापारासाठी धान्ये, अंबाडीच्या धाग्यांपासून बनवलेले कापड, गाळाच्या मातीची भाजून बनवलेली भांडी अशा गोष्टी होत्या आणि त्याच्या बदल्यात ते सध्याच्या ओमानमधून तांबे, अफगाणिस्तानातून नीलमणी (लॅपिस लाझुली), सीरियामधून लाकूड आणि अरबस्तानातून धान्य दळण्याच्या जात्यांसाठीचे दगड, इ. वस्तू आणत.

युफ्रेटिस नदीच्या काठावरील उरुक शहर त्याच्या उत्कर्षाच्या सर्वोच्च स्थानी असताना साधारण १३७५ एकर इतके विस्तारलेले होते आणि त्याची लोकसंख्या १ लाखाच्या घरात होती. त्यावेळपर्यंतच्या मानवी वसाहतींमधील ही लोकसंख्येची सर्वाधिक घनता होती.

उत्खननातून या शहराची बरीच माहिती मिळाली आहे पण अजूनही साधारण २५० एकरांचा भाग अभ्यासायचा बाकी आहे. १९९० च्या दशकात संयुक्त राष्ट्रसंघाने इराकवर लादलेल्या निर्बंधांमुळे हा अभ्यास थांबला तो अजून सुरू होऊ शकलेला नाही.

उरुक शहराच्या उत्खननात दोन मोठ्या इमारतींचे अवशेष सापडले. ही देवळे असावीत असा संशोधकांचा होरा आहे. जगभरातील संशोधनांनुसार भव्यदिव्य बांधकामे हा त्या समाजात ताकदवान

शासनकर्ते असण्याचा पुरावा मानला जातो. सुमेरमधील प्रत्येक शहराची एकेक स्थानिक देवता होती असे दिसते. या देवता मुख्यतः निसर्गाधिष्ठित (उदा. गोड्या पाण्याची देवता, समुद्राची देवता, इ.) होत्या.

उरुकमध्ये सापडलेल्या या इमारतींचा वापर देवळासोबतच धान्याची कोठारे म्हणून केला जात असावा असे संशोधनातून दिसते. म्हणजेच या देवळांचे पुजारी हे शेतीतून उत्पादित झालेले अतिरिक्त धान्य गोळा करून त्याचे वाटप व व्यापार करणे तसेच अडचणीच्या काळासाठी साठवणूक करणे इ. गोष्टी नियंत्रित करत होते. राजेशाही प्रस्थापित होण्यापूर्वी धार्मिक, आर्थिक व राजकीय शक्ती पुजाऱ्यांच्या हातात एकवटलेल्या असाव्यात.

भाषा लिहिण्यासाठी लिपीची निर्मिती व वापर सर्वात प्रथम करण्याचे श्रेय सुमेरियन लोकांना जाते. त्यांच्या क्युनिफर लिपीत त्यांनी केवळ कर संकलनाचे आणि व्यापाराचे हिशेबच लिहिले आहेत असे नाही, तर कथा, काव्ये, कादंबऱ्या, इ. विपुल लेखन केले आहे. हे सारे बऱ्यापैकी शिल्लक राहिले व या लिपीची संगतीही लागली यामुळे आज आपल्याला सुमेरियन संस्कृती, लोकांच्या धार्मिक धारणा, राज्यकारभाराच्या पध्दती, राजांच्या वंशावळी, इ. माहीत होऊ शकले आहे.

इ.स.पूर्व ३००० मध्ये उरुक शहराची रचना ही तीन भागांची बनलेली होती. त्यापैकी तटबंदीच्या आतमधील भागात देवळे, भव्य राजवाडे (तोवर राजेशाही प्रस्थापित झाली होती) आणि सामान्य नागरिकांची घरे होती. त्याबाहेर बागा, शेते, कुरणे असा परिसर होता. त्या पलिकडे बाजारपेठ होती आणि तिथे परदेशी व्यापाऱ्यांचीही दुकाने होती.



*उरुकच्या तटबंदीतील एक दरवाजा*
*(स्रोत – विकीपिडिया)*

उरुकमध्येच सापडलेल्या एका शिलालेखावर शहरातील प्रमाणित व्यवसायांची यादी दिली आहे. त्यानुसार तटबंदीच्या आतील नागरिक हे शेती व पशुपालन तर करत होतेच पण त्याशिवाय पुजारी, अधिकारी, लेखनिक, स्वयंपाकी, कुंभार, सोनार, गारुडी, इ. शंभर प्रकारचे व्यावसायिक शहरात होते. सामाजिक दृष्ट्या उरुक शहरात प्रशासक व पुजारी यांचे वर्चस्व होते. सामान्य नागरिकांपैकी काही लोक स्वतःची शेती करत तर काही इतरांसाठी वेगवेगळ्या सेवा पुरवत. व्यवसाय कोणताही असला तरी सर्व नागरिक शासकांना कर देत होते.

उरुकमध्ये गुलामही होते. हे मुख्यतः युध्दकैदी, गुन्हेगार किंवा कर्जबाजारी लोक असत. अंगमेहनतीची कामे गुलामांकडून करून घेतली जात. परिसरात उपलब्ध संसाधने मर्यादित असल्याने आजूबाजूच्या इतर शहरांच्या प्रशासकांबरोबर संघर्षही होत असावेत. अशा युध्दजन्य परिस्थितीतही शहराचा विस्तार होत गेला व त्यातच कधीतरी उरुकमध्ये वंशपरंपरेवर आधारित राजेशाहीचा उदय झाला. गिल्गामेशची कथा (एपिक ऑफ गिल्गामेश) या प्राचीन कहाणीचा कथानायक गिल्गामेश या पात्रामागील प्रेरणा उरुकचा पाचवा राजा गिल्गामेश हा होता.

मात्र इ.स. पूर्व ३००० पर्यंत सुमेरमध्ये इतरही शहरे प्रस्थापित झाली आणि उरुकचे एकमेवाद्वितीय असे महत्त्व संपुष्टात आले. या काळात सुमेरमधील ८५ टक्के लोक कोणत्या ना कोणत्या शहरात रहात होते. त्यामुळे सुमेरियन संस्कृती ही खऱ्या अर्थाने पहिली नागरी संस्कृती होती. साधारण इ.स.पूर्व २००० च्या सुमाराला उरुक शहराला उतरती कळा लागली. यामध्ये काही अंशी सतत होत असलेल्या लढायांचा हात असावा. पण याच कालावधीत या भागातील पावसाचे प्रमाण खूपच घटले. त्याचबरोबर सततच्या सिंचनामुळे क्षार वर येऊन जमीन खारपट होत गेली व तिची उत्पादकता कमी झाली. वाढत्या लोकसंख्येच्या अन्नपाण्याच्या गरजा भागवणे यामुळे अधिकाधिक बिकट होत गेले व लोकांनी इतरत्र स्थलांतर करायला सुरूवात केली. हेही या शहराच्या ऱ्हासाचे एक कारण असू शकते.

उरुक हे पहिले मोठे शहर व सुमेर हे पहिले राज्य असले तरी त्या कालखंडातील एकमेव निश्चित नव्हते. ज्या घडामोडींमुळे उरुकची निर्मिती झाली तीच परिस्थिती याच अक्षांशावरील इतर शेतीप्रधान संस्कृतीही अनुभवत होत्या. इ.स.पूर्व ४०००च्या सुमारास पावसाचे प्रमाण कमी होऊ लागणे, यामुळे पाण्याच्या शोधात लोक नद्यांच्या खोऱ्यांमध्ये एकवटणे, नद्यांच्या पूरक्षेत्रातील जमिनींच्या सुपीकतेमुळे शेतीची उत्पादकता वाढणे, त्या सुबत्तेमुळे परिसरातील लोकसंख्या वाढत जाणे आणि त्यातून गुंतागुंतीची समाजरचना असलेली शहरे निर्माण होणे हे सुमेरच्या अक्षांशावरील इतर दोन संस्कृतींमध्येही घडले - इजिप्शियन संस्कृती आणि सिंधू संस्कृती.


११००० वर्षांपूर्वी आज ज्याला आपण सहारा वाळवंट म्हणतो तो गवताळ कुरणाचा मुबलक पाणी असलेला प्रदेश होता. त्यामुळेच शेती व पशुपालनाच्या उगमस्थानांपैकी हेही एक ठिकाण होते. इथे लोक ज्वारी, भोपळावर्गीय भाज्या, कलिंगडे, व कपाशीची शेती करत. तसेच शेळी-मेंढी पालनही सुरू झाले होते. इ.स.पूर्व ५००० पर्यंत या भागात स्थानिक राजांच्या नेतृत्वाखालील स्वतंत्र गावे अशी रचना तयार झालेली होती. राजेपण आनुवंशिक होते व राजांना देवाचा अंश मानले जात होते. हीच परंपरा पुढे शहरीकरणानंतरही चालू राहिली.

इ.स.पूर्व ४००० नंतर हवामान कोरडे होऊ लागल्याने गवताळ सहाराचे वाळवंटीकरण होऊ लागले व ह्या भागातील लोकांनी दक्षिणेकडे चाड तलावाच्या दिशेने आणि उत्तरेकडे नाईल नदीच्या दिशेने स्थलांतर करायला सुरूवात केली. यातून चाड तलावाच्या आजूबाजूला नूबियन संस्कृती (सध्याच्या सुदान देशाचा उत्तर भाग) तर नाईल नदीच्या खोऱ्यात इजिप्शियन संस्कृती विकसित झाली. अलिकडे झालेल्या उत्खननातून असे दिसते की कदाचित नाईल नदीच्या खोऱ्यात उरुकपेक्षा जुनी शहरे असावीत पण ती उरुकपेक्षा मोठी होती का हे निश्चित करणे शक्य झालेले नाही.

नाईल नदीच्या पूरक्षेत्रातील जमीन अत्यंत सुपीक होती व पाणीही मुबलक होते त्यामुळे सुरूवातीला सिंचनाशिवायही अतिशय समृध्द शेती होऊ शकली. पण जसजशी लोकसंख्या वाढत

गेली तसे शेतीखालील क्षेत्र वाढत गेले. यातूनच इजिप्शियन लोकांनी कालव्यांवर आधारित सिंचनप्रणाली विकसित केली. सुमेरियन लोकांना आलेली जमिनी खारपट होण्याची समस्या इथे उद्भवली नाही कारण नाईल नदीला दरवर्षी पूर येई व पुराच्या पाण्याने जमिनीवर आलेले क्षार धुऊन नेले जात.

इ.स.पूर्व ३००० च्या सुमारास इजिप्तमधील सर्वात मोठे शहर होते, हिराकोनोपोलिस आणि त्याची लोकसंख्या होती १० हजार. तत्कालीन राजाने नाईल नदीच्या मुखाजवळ आणखी एक शहर वसवले, जे आजही अस्तित्वात आहे. हे शहर म्हणजेच आजच्या इजिप्तची राजधानी कैरो.



*इजिप्तमधील एका शाही थडग्यातील भित्तिचित्र. मुकादमाच्या देखरेखीखाली पेरणीपासून मळणीपर्यंतची शेतीतली कामे होत आहेत.*
*(स्रोत – विकीपिडिया)*

राज्य म्हटले की विविध स्वरूपांत कर गोळा करणे आले आणि त्या करांचा हिशेब ठेवणेही आले. यातूनच लिखित भाषेची निर्मिती होते. सुमेरमध्ये हे घडले आणि इजिप्तमध्येही. इजिप्तमध्ये चिन्हांधारित लिपीची निर्मिती झाली व पुढे त्या लिपीची विविध रूपेही विकसित झाली. पण सुमेरियन लोकांनी लिखित लिपीचा वापर करून हिशेब ठेवण्यापलिकडे इतरही विपुल लिखाण केले तसे इजिप्तमध्ये झाल्याचे दिसत नाही.

१७९९ साली नेपोलियनच्या एका सैनिकी तुकडीला अलेक्झांड्रियाजवळील रोझेटा गावात बसाल्टच्या दगडावरील एक शिलालेख सापडला. हा दगड ‘रोझेटा स्टोन’ म्हणून ओळखला जातो.

यावर एकच मजकूर ग्रीक भाषेत आणि इजिप्शियन संस्कृतीतील दोन लिप्यांमध्ये लिहिलेला आहे. यातील ग्रीक भाषा माहीत असल्याने इतर लिप्यांची उकल होऊ शकली व त्यामुळे इजिप्तमध्ये सापडलेल्या भूर्जपत्रांवर लिहिलेल्या मजकुरांचा अन्वयार्थ लावणे शक्य झाले आहे.

इजिप्शियन व नूबियन लोकांमध्ये व्यापारी संबंध होते तसेच दोन्हीकडच्या सत्ताधीशांमध्ये राजकीय संघर्षही होते व त्यातून युध्देही होत होती. पण अनेक नूबियन लोकही इजिप्तमधील शहरांमध्ये राहून विविध व्यवसाय करत होते आणि त्यांच्यामध्ये रोटी-बेटी व्यवहारही होत होते. इजिप्तचा मेसोपोटेमियाबरोबरही व्यापार चालत होता असे दिसते. मेसोपोटेमियातील शेळ्या-मेंढ्या पशुपालनासाठी इजिप्तमध्ये आणल्या गेल्या होत्या. तसेच मेसोपोटेमियातील वास्तुकलेचा प्रभाव इजिप्तमधील वास्तुकलेवरही पडलेला दिसतो. आशिया व आफ्रिका खंडांच्या सीमेवरील या संस्कृतीत काळे, गोरे व अधल्यामधल्या सर्व छटांचे आणि सरळ ते कुरळया अशा सर्व प्रकारच्या केसांचे विविध लोक गुण्यागोविंदाने एकत्र नांदत होते असे एकंदर पुरातत्वीय व ऐतिहासिक पुराव्यांवरून दिसते.

सिंधू नदीचा उगम हिंदुकुश पर्वतात होतो आणि तिथून प्रचंड मोठे पूरक्षेत्र तयार करत ही नदी अरबी समुद्राला जाऊन मिळते. एकेकाळी सरस्वती ही आणखी एक नदी सिंधूच्या बरोबरीने या भागात वाहात होती पण हिमालयाच्या पर्वतराजींमधील भूकंपांमुळे तिच्या उपनद्यांचे मार्ग बदलून त्या सिंधूला मिळू लागल्या व त्यामुळे पाणी आटत जाऊन ही नदी शेवटी लुप्त झाली. सिंधू व सरस्वती नद्यांचे प्राचीन पूरक्षेत्र म्हणजे आजचा जवळजवळ संपूर्ण पाकिस्तान आणि उत्तर भारताचाही खूप मोठा भूभाग. याचे एकंदर क्षेत्रफळ हे मेसोपोटेमिया आणि इजिप्त संस्कृतींनी व्यापलेल्या एकूण क्षेत्रफळापेक्षाही जास्त आहे! मेसोपोटेमिया व इजिप्तप्रमाणे इथेही पर्वतरांगा, वाळवंट आणि समुद्र यांमध्ये सीमित झालेला नद्यांच्या पूरक्षेत्राचा अत्यंत सुपीक प्रदेश अशी भौगोलिक रचना होती.